# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार


**दिनांक ०५.०६.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमांवर कारवाई करून ६३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ३,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०४४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२९,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) लकडगंज पोलीसांची संयुक्तीक कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०५.०६.२०२६ चे ०४.४० वा. ते ०५.५५ वा. चे दरम्यान, लकडगंज पोलीस व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, कृती, नागपुर यानी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून संयुक्तीकरित्या पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, टेलीफोन एक्सचेंज चौक, क्वालीटी वाईन शॉप समोर, सि.ए. रोड येथे एका संशयीत ईसमांस ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव असद अशपाक शेख, वय २० वर्षे, रा. न्यु लाईफ मेडीकल स्टोअर्स जवळ, हसनबाग, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे खिशात एका झिपलॉक पन्नीमध्ये ३०.२६ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, रोख ३,०००/—रू. असा एकुण ३,५३,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी. एस. अ‍ॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. पोलीस आयुक्त श्री. रविन्द्रकुमार सिंगल, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) श्रीमती विनीता साहु, मा. पोलीस उप

आयुक्त (परि. क्र. ३) श्री. राहुल मदने, मा. सहा. पोलीस आयुक्त (लकगडगंज विभाग) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अरूण क्षिरसागर, सपोनि. अमोल कोळेकर, पोउपनि. प्रशांत सरकाटे, सफौ. विजय कडु, पोहवा. प्रशांत सलामे, पोअं. विवेक हिरूडकर, अंकुश, राजेंद्र व धनंजय यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०५.०६.२०२६ चे ००.१५ वा. चे सुमारास, राणाप्रतापनगर पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हद्दीत, क्वीन बार समोर, त्रिमुर्ती नगर, नागपुर येथे एक ईसम पोलीसांना पाहुन पळाल्याने, त्यास पोलीसांनी पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव राहुल धनराज हातीबेंड, वय ३० वर्षे रा. गल्ली नं. ७, कामगार नगर, सुभाष नगर, नागपुर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३८६७/२०२४, दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोअं. अंकुश कनोजीया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे पोउपनि. मनोहर दंदाले यांनी आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.०६.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक ०४.०६.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. २१, जम्बुद्वीप नगर, हटवार आटा चक्की जवळ, अयोध्या नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सिध्दार्थ फागोजी खाब्रागडे, वय ६१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह त्यांचे नातेवाईकाचे लग्नाकरीता पुलगांव वर्धा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २५,०००/—रू., सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व ०२ घड्याळी असा एकुण किंमती २,३७,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. योगेश कोरडे ८८८८१८१९७७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**